# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

E-mail : desk17@dtemaharashtra.gov.in Web : www.dtemaharashtra.gov.in

कार्यालयीन आदेश :

क्रमांक : १७/तंशिसं/यशदा/२०१९/४६
दिनांक : १८.०३.२०१९

विषय :- "e-Governance for Institutional Development" या कार्यशाळे करीता अधिकाऱ्यांची नावे उपलब्ध करुन देणेबाबत..

संदर्भ :- यशदा यांचा दि.१६.०२.२०१९ रोजीचा ई-मेल संदेश...

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/तंत्रनिकेतन/ हॉटेल मॅनेजमेंट/ आर्किटेक्चर आणि MBA संस्थातील प्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख व वरिष्ठ अधिव्याख्याता यांचे साठी यशदा, पुणे येथे "e-Governance for Institutional Development" या विषयावर दिनांक २५ ते २७ मार्च, २०१९ व दिनांक २८ ते ३० मार्च, २०१९ या कालवधीमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या यादीतील प्रशिक्षणार्थ्यांची यशदा, पुणे येथे दिनांक २५ ते २७ मार्च, २०१९ व दिनांक २८ ते ३० मार्च, २०१९ या कालावधीमध्ये आयोजित करण्यांत आलेल्या "e-Governance for Institutional Development" प्रशिक्षणासाठी निवड करण्यांत आलेली आहे. सदर प्रशिक्षणास उपस्थित रहाणाऱ्या प्रशिक्षणार्थींची यशदा येथील डीएसी वसतीगृहामध्ये निवासाची व भोजनाची व्यवस्था आरक्षित करण्यांत आलेली आहे. सर्व प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण कार्यक्रम सुरु होण्यापुर्वी प्रशिक्षणासाठी उपस्थित रहावे.

सदर प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या अध्यापकांना अनुज्ञेय असणारा प्रवास भत्ता व दैनंदिन भत्ता त्यांच्या कार्यरत संस्थेकडून देय राहील.

(डॉ. सुरेश यावलकर)
प्र.सहसंचालक, तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:- माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित...

१) प्रा.प्रविण एस.रेवणकर, संचालक, माहिती तंत्रज्ञान केंद्र, यशदा, राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे - ४११ ००७

२) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर, यांना कळविण्यांत येते की, त्यांनी तात्काळ सदर प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या आपल्या विभागातंर्गत संस्थेतील अध्यापकांना सदर प्रशिक्षणास उपस्थित राहण्यासाठी कार्यमुक्त करण्याबाबत सूचित करावे.